Golden Research thoughts
Volume 2, Issue. 1, July 2012
ISSN:-2231-5063

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

डॉ. बाबसाहेब आंबेडकर : राष्ट्रीय संविधान मुल्य

लीला भेले,

मराठी विभाग प्रमुख ,श्री. बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय,
पांढरकवडा जि. यवतमळ 445 302
Email : nrumare@rediffmail.com

प्रस्तावना :–

''तुझे शब्दच असे की, काटयांच्या संगिनी व्हाव्यात
तुझा संघर्षच असा कि महाकाव्य
तुझ्या पायाजवळ गळून पडावित
ओरबडलास भूतकाळ, शिलगावलीस मने
मुक्त केलीस हिसकावलेली शस्त्रे अन्
पुकारलेस युध्द
तुझ्या डरकाळीने हादरले आकाश
डचमळली पृथ्वी
आणि बघता बघता चवदार तळयाला आग लागली.''

– ज. वि. पवार

19–20 मार्च 1927 रोजी महाडला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अभुतपूर्व असा सामाजिक समतेचा लढा दिला. तो भारतीय इतिहासाला भुशणावह असा होता. आधुनिक भारताच्या इतिहासातील दलित शोषितांचा, युगानुयुगे ज्यांनी अंधारयुगाचे निश्वास टाकलेत, अंपमानाची शिदोरी घेवून युगा–युगाचा प्रवास केला त्यांच्या साठी हा समतेचा क्रांतीलढा मुक्तीचे गीत आळवित होता. समतेच्या हक्कासाठीचे हे धर्मयुध्द होते. वरील विशयाचं मुल्य केवळ विव्दानांच्या चर्चेपुरतं मर्यादीत राहत नाही. समता आणि धर्म निरपेक्षतेचा विचार स्विकारल्या गेला नाही तर देशाचं भवितव्य काय ?हया सिध्दांता सोबतच त्या विषयाच्या उपयोजिततेचा (Theory with application) असा हा विषय आहे. या विचारांचं उपयोजन झालं पाहिजे ही या विषयाच्या निवडी मागची मुख्य भूमिका आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक, धार्मिक आणि राजकीय तत्वज्ञानाचा धागा पकडून प्रस्तुत विषयाची मांडणी करीत आहे.

समता, स्वातंत्र, बंधुता, धर्मनिरपेक्षता ही राष्ट्रीय मुल्ये होत. तो मानवतेचा अुन्नत वारसा आहे. राष्ट्राच्या स्वाभिमानाचे आणि जीवंतपाणाचे ते प्रतिक आहे. म्हणून तर महाडच्या समता संगराने निष्प्राणांमध्ये प्राण ओतले. मुक्या मुक्या बळी गेलेले ओठ क्रांतीचे रणशिंग फुंकण्यात फुरफुरू लागले. वर्ण्यव्यवस्था, जातिव्यवस्था, वर्गव्यवस्था आणि अस्पृश्यता ही अमानवी कृत्ये आहेत. समता हे एक महान तत्व आहे हे सिध्द झाले अन्याय चालूच रहावा ही रानवट माणसांची विकृती आहे. अस्पृश्यता ही अत्यंत निंद्य बाब आहे. माणसांचीच गुलामगिरी आहे, मानवी दुष्टाव्याचा तो उन्माद आहे. मानवतेवरचं ते लांच्छन आहे, म्हणून तर बाबासाहेबांनी समतेसाठी महाडच्या संगरातून रान पेटविले. या आंदोलनात मृतवत शरीरं, हजारो वर्षाची मुर्दाड मनं वादळाच्या मोर्चात नाचू लागली गावू लागली. विजांशी गोष्टी करू लागली. राष्ट्रीय ऐक्याचं भान ठेवून बाबासाहेबांनी दिलेला हा समतेचा लढा राष्ट्राच्या जीवनात सामाजिक, धार्मिक, आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी केलेला संघर्ष होता.

प्र. के. अत्रे म्हणतात – 'समता योग हा डॉ. आंबेडकरांच्या महान जीवनाचा संदेश आहे.' (नवयुग 20.04.1952)

वरिल विधानात सत्य आहे समता हे तत्व बाबासाहेबांच्या चळवळीचं अभिन्न अंग राहिलं आहे याची प्रचिती त्यांच्या संविधान मुल्यात आणि त्यांच्या एकूणच जीवनमुल्यात दिसून येते.

सारी माणसं इश्वराची लेकरे आहेत. समसमान आहेत. माणसे ही परमेश्वराचीच रूप आहे. असं म्हणणाऱ्या परंपारावादी धर्मशास्त्राने माणसामध्ये भेद केले परंतु संपूर्ण मानवजात ही समान आहे. हा विचारच बाबासाहेबांनी अनेक जनआंदोलनातून जनमानसा समोर ठेवला. ''महाड येथील धर्मसंगर व वरिश्ठ हिंदुची जबाबदारी'' या लेखात बाबासाहेब म्हणतात – ''महाड म्युनिसिपालटी ने सार्वजनिक ठरविलेल्या चवदार तळयावर पाणी भरल्याने मारहान झाली ही बाब केवळ पाण्याची सोय झाली या गोष्टीने क्षुल्लक आहे. असे कदाचित म्हणता

Please cite this Article as : ***लीला भेले, ,डॉ. बाबसाहेब आंबेडकर : राष्ट्रीय संविधान मुल्य*** **: Golden Research Thoughts (July; 2012)**

येईल 'भाला' काराप्रमाणे ती नळ लावून अथवा अन्य प्रकारे सोय उपाय योजून मिटविता येईल. परंतु दुसऱ्या दृष्टीने ही बाब क्षुल्लक नसून अत्यंत महत्वाची आहे कारण एका मोठया प्रश्नाशी तिचा संबंध पोहोचतो. त्यास दंगा म्हणण्यापेक्षा धर्म संगर म्हणणे जास्त सोईचे होईल. आम्ही मारामारी या दृष्टीने या पाणी प्रश्नाकडे मुळीच पाहत नाही. आम्ही त्यास समतेच्या तत्वासाठी मांडलेल्या धर्मयुध्दातील रणकंदन आहे असे समजतो.'' अस्पृश्यांचा हा प्रश्न ज्यांचा त्यांनी सोडवायचा आहे म्हणूनच 'अस्पृश्यता हा माझ्या देहावरील कलंक आहे.' या विचाराप्रत बाबासाहेबांच्य क्रांतीचा प्रवास जातो तो कलंक रक्ताने, आत्मयज्ञाने धुवून काढावा अशी प्रतिज्ञा घेवविली जाते. सामाजिक आणि धार्मिक विषमतेच्या विरोधापासूनच बाबासाहेबांच्या समतायुध्दाचा प्रारंभ होतो.''

धर्मनिरपेक्षता हा घटनेची उद्देशिका सांगणारा शब्द आहे. या शब्दाचा अर्थ विव्दान, तत्वज्ञ, राजकारणी, शिक्षणतज्ञ आदी लोकांनी आप–आपल्या तऱ्हेने लावला आहे. काहींनी धर्माच्या चौकटीत राहून तेव्हढाच सोयीचा अर्थ लावला आहे. किंबहुना धर्मनिरपेक्षतेची व्याख्याच काही विचारवंतांनी बदलवून टाकली आहे. या शब्दाचा खरा अर्थ सामान्य जनांना कळुच नये याची व्याख्या देखील राजकीय पक्षांनी बदलवून टाकली आहे. याची काही कारणं सांगता येऊ शकतात.

प्रतिगामी मानसिकता हे त्याचं एक कारण आणि दुसरं असं देशातील सर्वच व्यवस्थेचं सत्ताधिश पद आपल्याकडे राहावं ही अघोरी महत्वकांक्षा हे याचं दुसरं कारण. धर्मनिरपेक्षतेचा खरा अर्थ सांगणे ही बाब काहींना परवडणारी नाही हे तिसरं कारण! धर्मनिरपेक्षता हा शब्द सेक्युलॅरिझम हया इंग्रजी शब्दाचा अर्थवाचक. सेक्युलर या लॅटीन शब्दापासून सेक्युलॅरिझम हा शब्द बनला आहे – अशी धर्मनिरपेक्ष राज्याची व्याख्या करतांना डोनॉल्ड स्मिथ यांनी ''इंडिया ऍज ए सेक्युलर स्टेट.'' यांत म्हटले आहे.

धर्मनिरपेक्ष राज्य हे असे राज्य आहे. जे व्यक्ती आणि संस्था यांना धर्माचे स्वातंत्र्य देते जे व्यक्तिसोबत नागरिक म्हणून व्यवहार करते जे संविधान रूपात विशेष कोणत्या धर्मासोबत जोडले गेले नाही. जे राज्य कोणत्याही धर्माला चालना देत नाही किंवा कोणत्याही धर्मात हस्तक्षेप करत नाही. धर्मनिरपेक्षतेचं अंतरंग तपासून पाहिल्यास असे निदर्शनास येते की, धर्मनिरपेक्षतेची संकल्पना राज्य, धर्म आणि व्यक्ती यांचे तीन भिन्न परंतु एकदुसऱ्याशी संबंधित असे समीकरण बनते ते पुढील प्रमाणे सांगता येईल.

1) धर्म आणि व्यक्ती (धार्मिक स्वातंत्र्य)
2) राज्य आणि व्यक्ती (नागरिकत्व)
3) राज्य आणि धर्म (राज्य आणि धर्माचे पृथकत्व)

याचा अर्थच असा की, धर्मनिरपेक्ष लोकशाही म्हणजे राज्य सत्तेला कोणत्याही धर्मात लुडबूड करण्याचा अधिकार नाही. देशातील सर्व नागरिकांना ज्या धर्मावर त्यांचा विश्वास असेल त्या धर्माचे आचरण करण्याचे स्वातंत्र असावे. अमुक धर्म स्वीकारा अथवा त्याग करा असे किंवा त्या धर्माची निंदा, व्देश, अपप्रचार इत्यादिला धर्मनिरपेक्ष लोकशाहीत आश्रय दिला जात नाही.

दुसरे असे की, धर्म मानण्याचे स्वातंत्र्य वा न मानण्याचे स्वातंत्र्य धर्मनिरपेक्ष लोकशाहीत दिले जाते.

भारतीय राज्यघटनेच्या उद्देषिकेत म्हटले आहे –

''आम्ही भारताचे लोक भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्यचा व त्याच्या सर्व नागरिकास समाजिक, आर्थिक व राजकीय न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र दर्जाची व संधीची समानता निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तिची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करून संकल्पपूर्वक निर्धार करून आमच्या संविधान सभेत आज दिनांक 26 नोव्हेंबर, 1949 रोजी याव्दारे हे संविधान अंगिकृत आणि अधिनियम करून स्वतःप्रत अर्पण करित आहे.''

1)न्यायमुर्ती बेग (भारताचे सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायधिक, अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष) म्हणतात – ''धर्माच्या जोखडातून इथल्या अनिष्ठ व रूढीवादी परंपरांना (प्रवृत्तींना) संविधानातील संदेशाव्दारे सोडविले पाहिजे. धर्मनिरपेक्ष राज्याची संकल्पना तो पर्यंत अस्तित्वत येवू शकत नाही. त्यासाठी कायदे अधिक व्यापक केले पाहिजे.''
2)पं. जवाहरलाल नेहरू म्हणतात. ''हिंदुधर्माबद्दलची प्रचलित मते अतिशय अस्पष्ट आहेत. या धर्माची कुठलीही रूपरेशा अस्तित्वात नाही. या धर्माचे विविध पैलू आहेत. ज्याला जे वाटेल तसे तो या धर्माला स्वीकारतो.''(डिस्कव्हरी ऑफ इंडिया पृ.क्र. 77)
3)डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन धर्मनिरपेक्षतेची व्याख्या करतांना म्हणतात – ''सर्व धर्मांना समान दर्जा मिळवून देणे म्हणजे धर्मनिरपेक्षता.''
(राधाकृष्णनच जीवनवृत्तांत ''योजना'' ऑगस्ट 1989 पृ.क्र. 22)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध तत्वानुरूप धर्मांची पारख केल्यामुळे सर्व धर्म समान आहेत हे विधान बाबासहेबांना कधिच पटले नाही. त्या विधान इतके भोंगळ व दिशाभूल करणारा खोटा सिध्दांत दुसरा कोणताच नाही असे ते म्हणतात. (बुध्द आणि त्यांचा धम्माचे भवितव्य पृ.क्र. 222)

धर्मनिरपेक्ष लोकशाही ही धर्माला विरोध करणारी लोकशाही नाही. लोकशाहीची जे अनेक मुलतत्वे आहेत त्यातील एक तत्व ''धर्माचे आचरण करण्याचे स्वातंत्र्य असावे'' हे होय. धर्मनिरपेक्ष लोकशाही धर्मावर घालातो हा जो समज आहे आणि त्याचा फायदा घेवून धर्माचे नावाखली दुही पसरविण्याचा प्रकार होतो तो खरोखरच चुकीचा आहे. धर्मनिरपेक्ष लोकशाही राज्यावरील धर्माची पकड रद्द व्हावी राज्य कारभारात मनुस्मृतीचे, शारियतचे कायदे देवून वर्चस्व स्थापन करता येत नाही – असा अर्थ अभिप्रेत आहे.

व्हॉलटेअर 'सरकार' बद्दल म्हणतात – ''ती शासनप्रणाली अन्यायकारक आणि अहितकारक असते जी स्वार्था पलिकडे जावून कुठलेही नियम किंवा कायदा निर्माण करत नाही.'' शासक, मंत्री किंवा मोठे अधिकारी संविधानाला प्रामाणिकपणे लागू करण्याची, राबविण्याची शपथ घेतात परंतु या सर्वांच वर्तन संविधानात नमुद केलेल्या धारा 51 'क' कलमाच्या पूर्णपणे विरूध्द असते. अनेक शासकीय समारंभ धार्मिक विधींनी संपन्न केले जातात. उदा. भुमिपूजन, होमहवन, नारळ फोळणे, आरती ओवाळणे, कपाळावर गंध टिळा लावणे वगैरे प्रकार केले जातात. धार्मिक पुनरूज्जीवनाला प्रेरणा देणारे हे प्रकार बंद झाले पाहिजे असे व्हॉलटेअरचे मत आहे.

देशाच्या भवितव्याचा विचार करता 26 जानेवारी 1950 ला भारत प्रजासत्ताक होईल. तेव्हा भारताच्या स्वातंत्र्या बद्दलची भीती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केली होती. घटना समितीच्या समारोपीय भाशणात बाबासाहेब म्हणतात. ''इतिहासाची पुनरावृत्ती होईल की काय या प्रश्नाने माझे मन व्यग्र झाले आहे. जाती भेद आणि धर्म भेद आपले जुनेपुराने शत्रु आहेतच नवीन नवीन निरनिराळी ध्येये पुढे ठेवून जे राजकीय पक्ष निर्माण झाले आहेत व होणार आहेत त्यांची आता आपल्या जुन्या शत्रुंमध्ये भर पडणार आहेत. हिंदी लोक आपल्या पक्षाच्या मत प्रणालीपेक्षा आपल्या देशाला जास्त महत्व देणार आहेत की देशा पेक्षा आपल्या मत प्रणालीला जास्त महत्व देणार आहेत ? असे जर घडले तर आपले स्वातंत्र्य पुन्हा दुसऱ्यांदा संकटात सापडेल कदाचित कायमचे नश्ट होईल.'' अशी रास्त भीती बाबासाहेबांनी व्यक्त केली होती. (घटना

समितीतील समारोपाचे भाषण). बाबासाहेबांनी यासाठी जय्यत तयारीचे देखील आवाहन केले होते आपल्या रक्ताचा शेवटचा बिंदु असे पर्यंत आपण आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करू असा दृढ संकल्पदेखिल ते नागरिकांना करायला लावतात. धर्मनिरपेक्ष लोकशाहीचे अस्तित्व टिकविण्यासाठी ते पुढील उपाय सुचवितात.

पहिली गोष्ट – सामजिक व आर्थिक उद्दिश्टये साध्य करण्यासाठी सनदशिर मार्गाचाच अवलंब करावा. क्रांतीचे घातपाती मार्ग वर्ज्य केले पाहिजे. म्हणुनच बाबासाहेब म्हणतात–असनदशिर मार्ग म्हणजे आराजकाची उगमस्थाने होत.

दुसरी गोष्ट – जॉन्स स्टुअर्ट ने राजकारणातील व्यक्तिपुजेबाबत स्पश्ट इशारा दिला होता तो हा की, ''राजकारणात व्यक्ती किंवा व्यक्तिपुजा हि भावना जितके थैमान घालते तितकी जागातील कोणत्याही देशाच्या राजकारणात घालत नाही.'' धार्मिक क्षेत्रात भक्ती मुक्तीचा मार्ग ठरेल पण राजकारणात भक्ती किंवा व्यक्तिपुजा अधोगतीचा मार्ग आहे. हुकुमशाहीकडे नेणारा आहे. बाबासाहेबांच्या या विश्लेषणातून आजच्या राजकीय परिस्थितीतील व्यक्तिपुजेवर प्रकाश पडतो.

तिसरे असे की, ''राजकीय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक लोकशाही असेल तरच लोकशाहीचे अस्तित्व टिकते.'' सामाजिक लोकशाही म्हणजे – स्वातंत्र्य, समता, बंधुता तत्वे यांचा संगम. ती वेगवेगळी नव्हेत. समतेपासून स्वातंत्रतेला अलग करता येत नाही. समता नसेल तर नुसते स्वातंत्र्य मुठभरांची सत्ता प्रस्थापित करेल अशी भिती बाबासाहेब व्यक्त करतात.

या सर्वांत राष्ट्रीयत्वाचा मुलगामी विचार डॉ. आंबेडकरांना मांडायचा आहे. एक राष्ट्र म्हणजे काय ?सर्व मिळून एक राष्ट्र होते हि भावना मनात धरणे म्हणजे स्वतःची फसवणुक करणे असे बाबासाहेबांना वाटते. जाती भेदामुळे छिन्न विच्छिन्न झालेले लोक मिळून एक राष्ट्र कसे हावू शकेल हि खंत त्यांनी व्यक्त केली. बंधुभाव, समता, स्वातंत्राशिवाय राश्ट्राला अर्थ उरत नाही. आजवर मुठभरांनी सत्ता भोगली आहे. बहुजनांना संधी मिळाली नाही तर देशात दुफळी माजेल असा दिवस देशाचा घातवार ठरेल हा इशारा घटना समितीच्या भाषणात बाबासाहेबांनी दिला.

गेल्या हजारो वर्षाचा इतिहास पहिला तर राज्यसत्तेवर धर्माची जबरदस्त पकड होती असे दिसेल, यामुळे माणसा माणसाची विभागणी झाली. जाती, स्तर, अधिकार निश्चित झाले. आजही स्थीती फारशी बदलली नाही उलट नव्या रूपामध्ये ती अस्तित्वात आहे. मुल्ला, मौलवी, पोप, धर्मगुरू जसं सांगत आहे तसे विधी करावे तसेच वागावे असा धर्माशास्त्रांतील कायद्याचा आजही आग्रह धरल्या जात आहे. याचे प्रत्यंतर शाहाबानो पाटगी प्रकरणामध्ये न्यायालयाने निर्णय देताच शारियतच्या नावाखाली किती प्रचंड विरोध झाला होता हे दिसून येते. हिंदु मुस्लिम वैमनस्यातून उद्भवलेल्या बदलाच्या, सुडाच्या, अतिरेकाच्या स्त्रीया कशा शिकार होतात याचे सडेतोड आणि निर्भिड चित्रण तस्लीमा नसरिन यांनी लज्जा मधून चित्रित करते. गोदरा हत्याकांडातही याचे प्रचंड पडसाद गुजरातेत उमटल्याचे दिसून येतो.रजिया पटेल पडदा पध्दती विरूध्द स्त्रीमुक्तीचं आंदोलन उभं करते मुमताज रहिमत पुरे स्त्री स्वतंत्र्याचं कार्य करते ते कार्य धर्मविरोधी समजून तिच्या अपघाती मृत्यु नंतरही तिच्या दफणासाठी कबरस्तानात तिला जागा मिळत नाही हा धर्मांधतेचा कळस होय. सॅटेनिक व्हर्सेस मध्ये सलमान रशदी यांना पुरोगामी विचारामुळे हद्दपार केले जाते जगभर त्यांचा बोलबाला होतो. वादळ निर्माण होते. विषमतेच पुजक मनुचा पुतळा न्यायासनासमोर उभारला जातो. या घटना वर्तमानतल्या धर्मांध आणि जातीय प्रवृत्तीच्या निदर्शक आहेतच तसेच धर्मनिरपेक्षतेला आणि सामाजिक समतेचा तडा देणाऱ्या आहेत. काडीमोड घेण्याचा अधिकारही स्त्रीच्या वाटयाला येवू देवू नये या हुकूमशाही वृत्तीच्या द्योतक आहेत. धर्माने दिलेले आदेश हे राज्यसत्तेचे हुकूम ठरू नये म्हणून धर्मनिरपेक्षतेची परिस्थिती सापेक्ष शहानिशा व्हायला हवी.

प्रोफेसर मॅक्स म्युलर यांनी म्हटले आहे. ''भारताचा इतिहास आपणाला सांगतो की, प्राचीन काळात ब्राम्हणी संस्कृतिने (धर्माने) जी गुलामगीरीची जालीम साखळी निर्माण केली होती ती बौध्द धर्माने खिळखिळी केली बौध्द धर्माचे हे महान ऐतिहासिक कार्य आपणाला नाकारता येत नाही.'' या विधानातून सत्य तपासता येते. मुक्ता हि ब्राम्हणाची मुलगी भिक्शुनी झाल्यावर उद्गार काढते ''आ हा हा मी स्वतंत्र आहे माझ्या स्वातंत्र्याला सीमा नाही.'' मौतिका हि दुसरी भिक्शुनी उद्गारते ''मी या शीळेवर ध्यानस्त बसते तेव्हा स्वातंत्र्याचे श्वासोच्वास माझ्या अध्यात्मिक साधनेवरून सारखे वाहत असतात.'' भिक्शुनी होण्याचा हक्क देवून बुध्दांनी त्यांना स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा करून दिला. अविवाहित, विवाहित, विधवा, गणिका सर्वप्रकारच्या स्त्रियांना परिव्रज्जा होण्याचा दरवाजा खुला केला, पुरूषांच्या बरोबरीने स्वातंत्र्य, समता, आत्मविकास, महत्ता हि मानवी जीवनची सर्व अंग प्राप्त करून घेण्याची संधी दिली.
(हिंदु स्त्रियांची उन्नती अवनती पृ.क्र.26)

स्त्रीही सर्वोत्कृष्ठ देणगी आहे. तिच्यपासून बोधिसत्व आणि चक्रवर्ती जन्म घेतात असे तथागत गौतम बुध्द म्हणतात. (संयुक्त निकाय पृ. क्र. 63) अशा मानवी स्वातंत्राचा आणि समतेचा उद्घोष करणाऱ्या बौध्द धम्माच स्वीकार आणि लोकहिताच्या दृष्टीने त्याची पुन्हा मांडणी बाबासाहेबांनी केली. बौध्द धम्म कायम ठेवूनही अशी किमया केली. आपआपल्या धर्माचा पुनर्विचार करण्याची आणि नव्याने त्यांच तात्विक मांडणी करण्याचा आदर्श डॉ. आंबेडकरांनी घालून दिला. व्यवहार धर्माची सांगड घालून प्रत्येक धर्माला या विचाराच्या दिशेने जाता येऊ शकते. ज्या गोष्टी व्यक्ति विकासाला व्यक्ती स्वातंत्राला बाधा आणतात त्या एकविसाव्या शतकामध्ये त्याज्य ठरविता आल्या पाहिजे असा संदेश यातून मिळतो. धर्मातल्या अंधविश्वासांना चिटकून राहिल्याने अकारण मानवी उर्जा वाया जात असल्याचे अनुभव नवीन नाहीत. बाबासाहेबांनी धम्माला सामाजिक मूल्य दिल्यामुळे खालील परिणाम दिसून येतात.

1)धर्माचा आवश्यक गाभा कायम राहतो.
2)धर्मात इतरांनी हस्तक्षेप करण्याचा प्रश्न उरत नाही.
3)धर्मावर गंज चढलेली छोटी छोटी आवरणं पुसल्या जावू शकतात.
4)धर्मांच्या आतील किंवा गाभ्यातील प्रकाशमान मूल्यांवर आक्रमण होणार नाही.
5)धर्मांवरील आवरणे नाहीसे करून परिणामी होणारे जातीय संघर्श, ताण तणाव, धार्मिक दंगली, रक्तपात, विघातक कृत्ये थांबु शकतात.

आजचे वास्तव असे आहे की, जगात जेवढे लोक युध्दांत मारले गेले त्याहून कितीतरी अधीक लोक स्वतंत्र्योत्तर काळात जातीय आणि धार्मिक संघार्षांमध्ये मारले गेले. 'पाकिस्तानची फाळणी' मध्ये बाबासाहेबांनी प्रश्न केला होता– ''आपणास सुरक्षित सेना हवी की, सुरक्षित सीमा ? पाकिस्तान झाल्यास सीमा सुरक्षित राहिल अखंड भारत राहिल्यास सेना सुरक्षित राहिल.'' हिंदु मुस्लिम दोन्ही समाज सामाजिक विषमतेत ग्रस्त आहे. पाकिस्तानची निर्मिती हा स्वाभाविक उपाय आहे. मुसलमानांना पाकिस्तान पाहिजेच आहे हे एकदा निश्चित झाले कि त्यांचा सिध्दांत मान्य करणे हाच शाहाणपणाचा मार्ग ठरणार आहे. (पाकिस्तानची फाळणी पृ.क्र. 368)

या देशात हिंदु मुस्लिम हे दोन समाज नव्हे हे दोन राष्ट्र नांदत आहे. पाकिस्तानच्या बाजूने आणि विरूध्द बाजूने बाबासाहेबांनी जी खोलवर जावून भूमिका मांडली ती वस्तुनिष्ठ आणि तत्कालिन परिस्थितीचे वास्तवदर्शी असं चित्र आहे. डॉ. रावसाहेब कसबे यांनी 'बाबासाहेब' यांना मुस्लिम विरोधी म्हणतील ही भीती न ठेवता विश्लेशण करवे. मतभेत असतील तर व्यक्त करावे असा जो सल्ला दै. सकाळ 1994 च्या दिवाळी अंकात दिला आहे. त्यात त्यांचा अट्टहास दिसतो तटस्ततेचा आव आणणारा असा आहे. खरे तर बाबासाहेबांनीच विचार स्वातंत्र्याचे

पर्व उघडले. समाजाने व्यक्ती पुजक होवू नये म्हणून तथा भावनेच्या आहारी जाऊ नये यासाठी त्यांनी वारंवार आपल्या भाषनांमधून आणि लेखनातून विचार व्यक्त केले आहे. रावसाहेब कसबे यांचे 'हिंदु मुस्लिम प्रश्न आणि सावरकारांचा हिंदु राष्ट्रवाद' या पुस्तकाच्या समिक्षेच्या निमित्ताने जो मतभेत तटस्थपणे वाचकांसमोर प्रा. मोरे यांची मांडण्याचा जो प्रयास केलेला आहे तोच मुळी वादाचा विशय आहे. वादाच्या समर्थनासाठी त्यांनी दिलेली उदाहरण विस्तारभयास्तव इथे देता येत नाही. परंतु बाबाहेबांनी म्हटले आहे ''या देशाच्या इतिहासात विध्वंसक म्हणून माझ्या नावाची नोंद करून घेण्याची माझी इच्छा नाही. जर माझ्या मनत द्वेश असता तर पाच वर्शाचे आत या देशाचे वाटोळे केले असते. जो धर्म या देशाच्या प्राचीन संस्कृतीला धक्का देईल, अराष्ट्रीय बनविल असा धर्म मी कदापीही स्वीकारणार नाही.'' ही वस्तुस्थिती असतांना बाबासाहेबांना मुस्लिम व्दवेची ठरविणं हा दुराग्रह होय. हिन्दु–मुस्लिम या दोन्ही धर्माच्या सामाजिक आणि सांस्कृतिक वास्तवाची आणि त्याच्या परिणामाची जाणिव बाबसाहेबांना होती याचेच हे द्योतक नव्हे काय ?

म. ज्योतिराव फुले यांच्या सामाजिक चळवळी नंतर देषामध्ये टिळक – आगरकरांचे दोन प्रवाह उदयाला आले. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीचे हे दोन प्रवाह उघड मतभेद होते. म.गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राम मनोहर लोहिया, श्रीपाद अमृत डांगे, एस.एन. जोशी यांचे वैचारिक प्रवाह त्यानंतरच्या काळात अलग पडलेत. ते स्वातंत्र्य नंतर एकत्र आले नाही किंवा त्यांनी समन्वयाची भूमिका घेतली असे चित्र दिसू शकले नाही. एकीकडे साम्यवाद आणि दुसरीकडे हिन्दुत्ववाद जोपासायचा हे तर त्याचे कारण नसावे?त्या काळात हिंन्दु मुस्लिम तणाव होता परंतु त्यात मार्क्सवादी म्हणवणारे प्रखरतेने पडले नाहीत. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने आणि भाषीक जातीय तणाव होवू नयेत म्हणुन कोणती भुमिका त्यांनी घेतली ? असा प्रश्न उपस्थित होतो. या सर्व पार्श्वभूमीवर धर्मनिरपेक्षतेचा विचार जागता ठेवून संविधान मुल्यावर दृढ प्रेम करणारे, लोकशाही मुल्यांची जपणुक करणारी चळवळ हि आंबेडकरवादी चळवळ स्वातंत्रोत्तर कालखंडामध्ये उदयाला आली, हि चळवळ सोडली तर इतर चळवळी ''सेक्टरीयन'' आहेत की नाही याचा सखोल विचार व चिंतन सर्व चळवळीतील थोर विचारवंतांनी केला पाहीजे. पंजाबातील आतंकवाद्यांचा हैदोस, काश्मिरातील विघटन वादाच्या भडकलेल्या भावणा, भिवंडीतील–मालेगांवातील जातीय दंगली, मराठवाडयातील नामांतरणाचे आंदोलन आणि रमाई नगरातील निरपराध्यांवर झालेला गोळीबार, मुंबईतील बॅम्ब हल्ला प्रकरण वा खैरलांजीतील मानवतेला खाली मान घालायला लावणारी कृत्ये या पाठीमागे जातीय आणि धार्मिक हत्यारं प्रबळपणे उभी आहेत. या हत्यारानीच देशातील वातावरण तापविल्या गेलं. राष्ट्राची एकात्मता धोक्यात आली. अयोध्येतही तेच घडलं. त्याचे पडसाद भारतातील आम जनतेला आज भोगावे लागत आहे. घटना समितीच्या समारोपीय भाषणामध्ये बाबासाहेबांनी दिलेली धोक्याची सुचना खरी ठरली. ''इतिहासाची पुनरावृत्ती होईल तो दिवस घातवार ठरेल. '' हे भाकीत खरे ठरले. ते एवढया टोकावर की, 6 डिसेंबर हा दिवस बाबासाहेबांचा महापरिनिर्वाण दिवस देशाच्या इतिहासामध्ये तो दिवस काळा ठरावा असंही नियोजन. 6 डिसेंबर 1992 हाच तो दिवस रामलल्ला वादाची परिसीमा ! धर्मनिरपेक्षता हे संविधान मुल्य स्विकारल्या नंतर मंदिर–मस्जीद वाद हा असा पराकोटीला पोहचावा हे आश्चर्यच आहे. अशी आश्चर्य जोपर्यंत कायम राहणार तो पर्यंत जाती व धर्मांतर्गत कलह अधिकच चिघळत राहणार. धर्मनिरपेक्षता म्हणजे सर्वधर्मसमभाव असा चुकीचा अनैतिहासिक अर्थ गेल्या कित्येक दिवसापासून मांडल्या जात आहे. लोकशाही स्विकारलेल्या भारत देशात धार्मिक विध्वंसनाचे पडसाद भारतात व भारता बाहेरही कसे उमटलेत हे भारतीयांनी अनुभवले आहेत. आज दिसत असलेल्या शांततेत उद्याचे दडलेले वादळ नसणार असे कसे म्हणता येईल?

आमच्या सेक्युलर वादातून धर्म जोपर्यंत बाहेर येत नाही. धर्म आणि राजकारणाची फारकत जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत देश असुरक्षित राहणार. अराजकतेचे राजकारण करणारे, हिंसाचाराचे थैमान घालणारे राज्यकर्ते आज स्वार्था पलिकडे जायला तयार नाहीत. यासाठी देवा धर्माचे भांडवल त्यांनी भांडवल म्हणून वापरले, शस्त्र म्हणून वापरले. भ्रष्टाचाराबद्दल बोलणे हा एक शिष्टाचार झाला आहे. नैतिकता ढासळत आहे. देश परकियांच्या ओझ्या खाली झुकत चालला आहे. जल – जंगल आणि संपत्ती जागतिकीकरणाच्या नावाखाली गहाण आहे. महागाईचा आलेख दरेक क्षणाला वाढतो आहे. मुल्य हा चेश्टेचा विषय झाला आहे. राष्ट्रीय चारित्र्य संपुष्टात येत आहे. या सर्व गोष्टींचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. भाषावाद, धर्मवाद, प्रांतवाद, नियतीवाद आणि जातीयवादाची काठोर मिमांसा करणाऱ्या सनदशीर आणि सम्यक अशा आंबेडकरी चळवळीलाच या भारत भूमीवर स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातही, जग जवळ येण्याच्या काळातही अनटचेबल ठरवावं हे अतिशय हानिकारक आहे. देशाची काळजी वाहणाऱ्या विचारवंतांच्या ध्यानी ही बाब येवू नये याहून अधिक दुर्दैव दुसरे नाही.

दुसरी कडे आंबेडकरी चळवळीतल्या पाईकांनी बाबासाहेबांची घटना स्वीकारली परंतु ''संघटना'' दुर्लक्षीत केली हे विशारी वास्तव आहे. वस्तुतः देश हिताच्या दृष्टीने आंबेडकर विचार आणि चळवळ म्हणजे प्रमुख राष्ट्रीय प्रवाह आहे. तथापी आंबेडकरांचे नांव घ्यायला स्त्रीमुक्ती पासून साऱ्याच पांढरपेशी चळवळी बिचकतात. अलिकडे गठ्ठामतांचं राजकारण चालतं, त्यासाठी जातीयवाद आणि धर्मवाद प्रामुख्याने जोपासल्या जातो. त्यातही काही धर्मवादी वृथा धर्माच अभिमान बाळगूनये असा समज देणारे आहे. काहींना धर्मा–धर्मातील तेढ निर्माण करण्याची इच्छा नसली तरीही सत्तेच्या हव्यासापोटी ते तसे करतांना दिसतात. त्यामुळे भारतीय युवा मनावर विपरीत परिणाम होत आहे. भविष्याच्या दृष्टीने ही विषारी पेरणी अतिशय घातक ठरणारी आहे. समता आणि धर्मनिरपेक्षता या शब्दांचाही ते अव्हेर करतात. तो शब्दच त्यांच्या डिक्शनरीत नाही. समता कोणत्या प्रकारची?समाजिक – आर्थिक की राजकीय प्रस्तापितांना समता नको असते. ममता त्यांना अधिक आकर्शक वाटते कारण ममतेत विषमता अभिप्रेत असते. ममतेमुळे धर्मवाद जोपासता येतो. ममतेत सामाजिक, आर्थिक स्तरिकरणला मान्यता असते. या उलट समतेत रावरांक, उच्च–निच्चता याला थाराच नसतो. ''आहे रे – नाही रे'' हे वर्गच समता तत्वाला अमान्य आहे. 'आहे रे' पर्यंत 'नाही रे' पोहचू नये त्यांनी खालीच रहावे या इच्छेतूनच ममतावृत्ती उदयास येत असते. बाबासाहेबांना समता ही Equality Before Law अशी हवी होती. बुध्दांनी 'करूणा' सांगितली कारूण्य नाही. करूणेत दयेचा प्रश्नच उद्भवत नाही. समतेतला दया हाच खरा धोका आहे. असे प्रेमानंद गज्वींना वाटते. (अस्मितादर्श मेळावा, चंद्रपूर – अध्यक्ष) गज्वींच्या या विधानामध्ये सत्यता आहे. प्रस्तापितांना दानाचे वेड आहे. त्यात गुलामी आहे. या दाना मुळेच गुंड प्रवृत्तीची माासं निवडुन येतात. खालचे खालीच राहिले पाहिजे या भुमिके मुळे भुकेल्यांच्या ओटयामध्ये उतू गेलेला पैसा ओतण्याची दानशुरांची परंपरा राजकीय क्षेत्रामध्ये हैदोस घालत आहे. सगळेच रॉबिन हुड व्हायला लागले तर . . . एखाद्या शामा कोलामाचं सोडा तो निरक्षर असूनही जमविलेली संपत्ती गरिबांना वाटायचा परंतु समाजाचे मुखिया म्हणून ज्यांना आपण समजतो ते सामाजिक जीवनात दरोडेखोरांचीच भूमिका वठवितात. बुवा–बाबा ही त्याला अपवाद नाही. या सामाजिक दरोडेखोरीतला काळा पैसा असहाय व ''नाही रे'' वर्गाला द्यायचा. एक पैश्याच्या मोबदल्यात शंभर पैसे कमवायचे. या दुर्बलतेचा फायदा घेणारी शक्ती – भांडवलवादी असो राजकारणातील बडी मंडळी असो, नोकरशाही असो वा धर्मवादी असो या चारही लोकांनी समतेचा विपर्यास केला आहे. बाबासाहेब म्हणाले होते. 'गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या.तो बंड करून उठेल.' चिनी भाषेमध्ये एक म्हण आहे. "Give Fisher Man a Net Not a Fish" & ''कोळयाला मासे देण्याची गरज नाही. त्याला जाळे द्या.'' शोषितांचे बाहुबल कमी केल्या जात आहे. ते समतेच्या मार्गावर कसे येतील. सांप्रत स्थितीत देशांत सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात 'आहे रे' आणि 'नाही रे' वर्ग कायम ठेवून समानता जोपासण्याचा दांभिक मार्ग अनुसरल्या जातो. देणाऱ्यांचा अहम कायम ठेवून हे केल्या जातं. देशातल्या एकूणच प्रबोधन करणाऱ्या मंडळींची वाणी आणि लेखनी बोथट झाली आहे. प्रबोधनकारच खऱ्या अर्थाने संपले आहेत. खरे निष्ठावंत ''हिन्दुत्ववादी'', ''मुस्लिमवादी'' इत्यादी वादात अडकून पडले आहेत. संत कबीर, म. फुले, छत्रपती शाहु महाराज, डॉ. आंबेडकर अशा टिकेत अडकुन पडले नाहीत. स्वतःच्या आचार आणि विचारांनी त्यांनी जग

हलवलं म्हणून हिंन्दु मुस्लिम दोघांनाही ते आपले वाटतात. कबीर, संत नामदेव, संत तुकाराम, म.फुले, डॉ. आंबेडकर, गाडगे बाबा या तोडीचे विचारवंत अथवा संत या शतकात जन्माला आले नाहीत. तसे होते तर राज्याच्या अथवा देशाच्या सत्तास्थळी धर्मवादी विराजमान झाले तरीही. घाबरण्याचा प्रश्न निर्माण झाला नसता. 18–25 वर्शाचे युवक विधानभवनात हर हर महादेवच्या घोशणा देत येतात. मुर्दाबाद – जिंदाबाद शिवाय त्यापलीकडेही काही भव्य–दिव्य आहे याची जाणिव ठेवत नाहीत. थोरांनी पोरांची पातळी गाठली तर त्याला अर्थ नाही. लाट आहे–तिथे लोकशाहीचा अंत होत असतो. एकीकडे 'एक मत एक मूल्य' आहे–असं बाबासाहेब म्हणतात. संविधानाच्या चौकटीत निवडणुका घ्याव्या लागतात. शि.म. परांजप्यांनी म्हटले आहे. ''जसे लोक तसे त्यांचे देव.'' लाट येते तेथे लोकशाही संपते. प्रबोधनाच्या बाबातीत आम्ही संत कबीर, संत नामदेव, गाडगे महाराज, म.फुले, डॉ. आंबेडकर इत्यांदी मानवतावादी विचारांच्या पातळीवर गेलो नाही. परिणामी समता–बंधुता–न्याय–स्वातंत्र व धर्मनिरपेक्षता हे राष्ट्रीय पंचशील मृतावस्थेकडे जात आहेत. विसाव्या शतकाच्या प्ररंभापासून खरे प्रबोधनकार जन्माला आले नाहीत. जमेल तेवढं प्रबोधन करायचं. देश ढवळून टाकेल असा प्रबोधनाचा जमाना नष्ट होत आहे.

यावर उपाय काय?

फुले – आंबेडकरवादी चळवळीवर जगाने विश्वास टाकावा. सम्यक परिवर्तनाची शक्ती या विचारधारेत आहे. रचनात्मक, विधायक, पुरोगामी, लोकशाही मुल्याधार असलेली ही विचारधारा आहे ते एक जनआंदोलन आहे. यामुळे परिवर्तनाच्या चळवळी पुढे एक मोठे आव्हान उभे ठाकले आहे. विचार पेरण्याचे, जागरणाचे, हाकारा करण्याचे. उचित दिशा दर्शनाचे ! फुले – आंबेडकर – भगतसिंह – शाहु महाराज – संत कबीर इत्यादी तमाम थोर विचारवंतांचे साहित्य नवीन पिढीसमोर ठेवता आले पाहिजेत ती जबाबदारी या परिशदेने बऱ्याच अंशी साध्य झाली.

दुसरे असे सहकारी तत्वावर प्रकाशन संस्था निर्माण व्हाव्यात. फुले, आंबेडकर, छ.शिवाजी महाराज, शाहु महाराज, म. गांधी, गाडगेबाबा, विवेकानंद, सावरकर, आगरकर, भगतसिंह नव्हे मनुस्मृती, गोळवलकर गुरूजी सुध्दा या साऱ्यांचे मुळ विचार तरूणांपर्यंत पोहचवा नव्या पीढीला राष्ट्रप्रेमी आणि राष्ट्रद्रोही विचार कोणते?पुरोगामी आणि प्रतिगामी विचार कोणते? समाज हितेशी आणि समाज विरोधी विचार कोणते ते कळतील. कॅडरबेस वर हे झालं पाहिजे विचारांची बांधणी झाली पाहिजे. सम्यक विचार, सम्यक आचार आणि सम्यक परिवर्तन झाले पाहिजेत. आंबेडकरवादी चळवळीपुढे हे एक आव्हान आहे. विधान भवनावर संप्रदायाची पताका पोचली आहे असे म्हणण्यात अर्थ नसतो. त्या पताक्याला योग्य दिशा देण्याचं सामर्थ्य आंबेडकरांच्या संविधान मुल्यात आहे.

आंबेडकवाद हा राष्ट्रीय मुल्यांच्या दृष्टीने मौलिक कामगिरी बजाऊ शकेल यावर माझा विश्वास आहे. बाबुराव बागुलांच्य शब्दांत. . . . .

कित्येक पिढया तुझ्यासाठी खर्ची पडल्या
पण तू आलीच नाहीस
होते तसेच राहिले
मला माहित आहे या देव देवतांच्या देशात
चार्वाक चिरडला गेला आणि
बुध्द अवतार झाला
तशी तू होवु नयेस म्हणून वाटल्यास
लवकर येवु नको
यायचे असेल तेव्हाच ये पण येतांना तेव्हा
निदान तुझ्याजवळ आंबेडकरांची
जळजळ तरी असू दे

(क्रांतीस – बाबुराव बागुल)